पदोन्नती

विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असताना शासकीय सेवकास दिलेल्या पदोन्नतीचे नियमन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: एसआरव्ही–1095/प्र.क्र.29/95/बारा,
मंत्रालय, मुंबई–400 032, दिनांक 22 एप्रिल, 1996.

वाचा :– शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही–1075/10, दिनांक 2 एप्रिल, 1976.

## शासन निर्णय

विभागीय चौकशी प्रलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचारी ह्यांच्या पदोन्नतीसाठी विचार करताना काय कार्यपध्दती अवलंबिली जावी, ह्या संबंधात सविस्तर सूचना उपरोलिखित परिपत्रकान्वये विहित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार –

(अ) विभागीय चौकशी प्रलंबित असतानाही, ज्येष्ठताक्रमानुसार विचारक्षेत्रात येणारे अधिकारी/कर्मचारी पदोन्नतीस पात्र असल्याचे निवडसमितीस आढळल्यास अशा अधिकारी/कर्मचारी ह्यांचा निवडसूचीत तात्पुरत्या स्वरुपात समावेश केला जातो व नंतर, पदोन्नती आदेशित करण्यास सक्षम असणा–या अधिका–याने अशा दोषारोपांचे स्वरुप लक्षात घेवून, त्यास चौकशीच्या निर्णयाची वाट न पहाता तात्पुरती पदोन्नती द्यावयाची काय ह्याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घ्यावयाचा असतो,

(ब) विभागीय चौकशी नंतर, अधिकारी/कर्मचारी ह्यास दोषमुक्त ठरविल्यास, ओघानेच त्याची तात्पुरती पदोन्नती नियमित केली जाते. परंतु, अधिकारी/कर्मचारी ह्यांचे विरुध्दचे आरोप सिध्द होऊन, त्यास काही शिक्षा झाली तर शिक्षेची अंमलबजावणी करण्याकरिता त्याची तात्पुरती पदोन्नती संपुष्टात येते.

ह्यासंबंधात, शासनाच्या असे निदर्शनास आले की, दीर्घकाळ चाललेल्या चौकशीच्या प्रक्रियेनंतर, अपचारी अधिकारी/कर्मचारी ह्यांस, वेतनवाढ/वाढी, रोखण्याची सौम्य शिक्षा झाल्यावर, ही शिक्षा भोगण्यासाठी अधिकारी/कर्मचारी ह्यास, निम्न पदावर पदावनत करणे जाचक ठरते, म्हणून ह्या सर्व बाबींचा काळजीपूर्वक विचार करून शासन असे आदेश देत आहे की,

(1) विभागीय चोकशी प्रलंबित असतानाही, जाणीवपूर्वक निर्णय घेऊन तात्पुरते पदोन्नत करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी ह्यास चौकशीनंतरच्या निर्णयानुसार वेतनवाढ/वाढी रोखण्याची सौम्य शिक्षा झाल्यास, शिक्षा भोगण्यासाठी, त्यास निम्न पदावर, पदावनत करण्याची आवश्यकता नाही. वेतनवाढ/वाढी रोखण्याच्या शिक्षेची अंमलबजावणी पदोन्नतीच्या उच्च पदावरच करण्यात यावी. मात्र त्यासाठी त्याची, "त्याची उच्च पदावर शिक्षा भोगण्यास" तयारी असल्याची लेखी पूर्वसंमती घेण्यात यावी. जर त्याने लेखी संमती देण्याची नाकारल्यास, त्यास निम्न पदावर पदावनत करून, त्या पदावर शिक्षेची अंमलबजावणी केली जावी व शिक्षेचा कालावधी पूर्ण होईपर्यन्त त्यास पदोन्नाती दिली जाऊ नये.

8 NOV 1996

शा.म.मु.रोटा/सा.प्र.वि./एच–144(4000–6–96)–1

(2) ज्या प्रकरणी पदोन्नती रोखण्याची शिक्षा देण्यात आली असेल, अशा अपचारी अधिकारी/कर्मचारी ह्यास तात्काळ मूळ पदावर पदावनत करण्यात यावे.

हे आदेश दिनांक 1 जानेवारी, 1995 पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के. सी. श्रीवास्तव
प्रधान सचिव (सेवा).